# १९९२ ते २००२ निर्गुंतवणू क एक प्रवास

१६ सप्टेंबरला सर्वोच्च न्यायालयाने एचपीसीएल आणि बीपीसीएल या कंपन्यांच्या निर्गुंतवणूकीसाठी संसदेची मान्यता घेण्याचा निर्णय दिला. ही खबर दलाल स्ट्रीटवर येउन थडकताच भारतीय भांडवल बाजाराने टाहो फोडला. या दोन कंपन्यांच्या समभागाचे भाव घरंगळले. भांडवल बाजार हा खरं तर भारताच्या दैनंदिन आर्थिक घडामोडींचा खराखुरा आरसा. पण त्यात सामाजिक व्यवस्थांचं प्रतिबिंब दिसत नाही. न्या. राजेंद्र बाबू आणि जी.पी.माथूर यांनी दिलेल्या या महत्वपूर्ण निर्णयामुळे निर्गुंतवणूक प्रक्रियेला शह बसला आहे हे जरी खरं असलं तरी या निर्णयामुळे निर्गुतवणूक प्रक्रियेत असलेल्या काही महत्वपूर्ण त्रुटींपैकी एक त्रुटी दूर झाली आहे. पूर्वाश्रमीच्या एस्सो आणि बर्मा शेल या कंपन्यांना १९७४ साली सरकारने संसदेत ठराव मांडून सरकारी करुन घेतलं होतं त्यामुळे त्यातला सरकारचा हिस्सा कमी करायचा असेल तर संसदेची मान्यता घेतलीच पाहिजे. हा निर्णय एकूण निर्गुंतवणूक प्रक्रियेत महत्वाचा मानला जाइल. एचपीसीएल मधल्या कामगारांनी या निर्णयाचे स्वागत फटाके फोडून केलं. या निर्णयाच्या निमित्ताने पूर्ण निर्गुंतवणूक प्रक्रियेचा घेतलेला हा आढावा.

भारताची अर्थव्यवस्था ८१-९१ या दशकात दिवाळखोरीशी शिवाशिवीचा खेळ खेळत होती. कित्येकवेळेस दिवाळखोरीच्या उंबरठ्यावरुन आपण परतलो. पण प्रत्येक गोष्टीला मर्यादा असतात. आपल्या अर्थव्यवस्थेने किमान मर्यादा गाठली होती. त्यामुळेच असेल ९१ सालापासून आर्थिक सुधारणांना सुरुवात झाली. आणि ख-या अर्थाने आर्थिक सुधारणांना चालना देणारा अर्थसंकल्प तत्कालिन अर्थमंत्री श्री. मनमोहनसिंग यांनी मांडला. या आर्थिक उदात्तीकरणासाठी मग निर्गुंतवणूक नावाच्या एका गोंडस कल्पनेचा जन्म झाला. ''निर्गुंतवणूक'' या शब्दांचा साधा सरळ अर्थ सरकारने सार्वजनिक क्षेत्रातल्या सरकारी कंपन्यात असलेली आपली मालकी कमी करणे असा होतो. भारतीय कंपनी कायद्याच्या ६१९ कलमाप्रमाणे सरकारचं (केंद्र राज्य अथवा दोन्हीचं ) भागभांडवल ५१ टक्के असल्याशिवाय कोणती कंपनी सरकारी कंपनी होउ शकत नाही. ज्या गोष्टी जगात कुठेच होत नाहीत ना त्या फक्त भारतात होतात. टाटा आणि बिर्लासारखे मोठे मोठे उद्योगसमूह २६ टक्के भांडवलावर आपले उद्योग यशस्वी पणे चालवतात. काही देशांमध्ये केवळ ५-१० टक्के भांडवलावर सरकार सार्वजनिक कंपन्या चालवतात अशा कंपन्यातले सोनेरी समभाग सरकारकडे असतात- आणि इथे ५१ भारतात टक्के !

## निर्गुंतवणू क कशाला ?

१९९१ साली कृष्णमूर्ति समिती आणि १९९२ साली रंगराजन समिती निर्गुंतवणूकीचा अभ्यास करण्यासाठी नेमण्यात आल्या. या समिती अहवालांचा नेमका उपयोग काय असतो हा पुन्हा स्वतंत्र लेखनाचा विषय. पण निर्गुंतवणूक करण्यामागचा हेतू या समिती अहवालंनी निश्चित करुन दिला. सार्वजनिक कंपन्यात संशोधन कार्याला चालना मिळावी, खाजगी क्षेत्रातल्या दिग्गज उद्योगसमूहांकडून व्यवस्थापन कौशल्ये शिकायला मिळावीत , उच्च तंत्रज्ञान सार्वजनिक क्षेत्रात सर्रासपणे वापरलं जावं, सार्वजनिक कंपन्यांच्या विस्तारासाठी मुबलक निधी उभा रहावा हा खरा हेतू निर्गुंतवणूकीचा. पण या समितीचा अहवाल हातात आल्यावर तत्कालिन राज्यकर्त्यांव्दारे डंखा पिटला गेला तो - वित्तीय तूट भरुन काढायचा राजमार्ग सापडला असल्याचा. त्यामुळेच आता सरकारला चिंता असणार ती या कंपन्यांच्या निर्गूंतवणूकीतून येणारा पैसा न आल्यामुळे वित्तिय तूट भरली जाणार नसल्याची.

आयकर आणि अप्रत्यक्ष कर हे सरकारी उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत. पण कोणताही नागरिक आयकर का भरतो ? अभ्यास तो करतो, नोकरी तो करतो , घाम तो गाळतो आणि आपल्या उत्पन्नाच्या ३० टक्के दान करतो ? का ? कशाला द्यायचं हे दान ? काय मिळतं यातून ?

कर देउन मध्यमवर्गीय पगारदार सामान्य नागरिक विकत घेत असतो ती सभ्यता !

या सामान्य नागरिकाने भरलेल्या आयकरातून सरकार सार्वजनिक कंपन्या नावाच्या मोठ्यामोठ्या मालमत्ता उभारत असतं. ज्या क्षेत्रात खुप मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याची गरज असते त्या क्षेत्रात राष्ट्राच्या प्रगतिसाठी सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्या उभ्या राहतात. या मालमत्ता विकायला काढणं ही खरं तर लाजिरवाणी गोष्ट. आपल्या समाजात मालमत्ता विकून रोजचे खर्च भागवणा-या कंपनीकडे फारशा चांगल्या नजरेने खचितच बघितलं

जात नाही. पण निर्गुंतवणूक प्रक्रिया म्हणजे पैसे मिळवायचा राजमार्ग अशीच सगळ्या सरकारांची धारणा झालेली आहे. निर्गुंतवणूक मंत्रालयाचं संकेतस्थळावर असलेलं , त्यांच्या मागल्या दशकातल्या कार्याचं मोठ्या तो-यात केलेलं विवेचन याची साक्ष देइल. १९९२-२००३ या १२ वर्षात एकूण २९४८७ कोटी रुपये या प्रक्रियेव्दारे उभारण्यात आले होते.

कोणत्या कंपन्यांचं निर्गुंतवणू कीकरण होतं ?

फारच असंबध्द प्रश्न आहे हा. भारत हे राष्ट्र ना हिंदू ना मुस्लिम- सर्वधर्म समभाव, भारताची अर्थव्यवस्था ना भांडवलशाही ना समाजवादी- मिश्र अर्थव्यवस्था , भारताची संस्कृति ना पुरोगामी ना सुधारित- मिश्र संस्कृति. तसंच कोणत्या कंपन्यांच निर्गुंतवणूकीकरण होणार तोट्यातल्या की फायद्यातल्या - मिश्र निर्गुंतवणूक. थोड्या फायद्यातल्या तर थोड्या तोट्यातल्या. सगळीकडे संमिश्र भाव का कोणास ठाउक ? बरं खाजगीकरण तरी करणार का पूर्णपणे- तर तिथेही सरकारचं भागभांडवल- २६ टक्के राहणारच पण खरेदीदाराला दिली जाणार ती मुभा आर्थिक आणि दैनंदिन कामकाजा संदर्भातले निर्णय घ्यायची.

| वर्ष | निर्गुंतवणू कीव्दारे मिळालेली रक्कम |
|---|---|
| १९९१-९२ | ३०३८ कोटी |
| १९९२-९३ | १९१३ कोटी |
| १९९३-९४ | शून्य |
| १९९४-९५ | ४८४३ कोटी |
| १९९५-९६ | ३६२ कोटी |
| १९९६-९७ | ३८० कोटी |
| १९९७-९८ | ९०२ कोटी |
| १९९८-९९ | ५३७१ कोटी |
| १९९९-०० | १८९२ कोटी |
| २०००-०१ | २००० कोटी |
| २००१-०२ | ८६६१ कोटी |

१९९१ साली जेव्हा निर्गुंतवणूक करायचं ठरलं तेव्हा तेव्हा सीएमसी आणि आयपीसीएल या कंपन्या यादीत होत्या.सीएमसीला आता टाटा समूहाने घेतलं पण या यादीत जेव्हा या कंपनीचं नाव आलं तेव्हा या कंपनीला निव्वळ तोटा होता. आयपीसीएल- आता रिलायन्स उद्योगसमूहाचा भाग असलेली कंपनी आपली आर्थिक पत्रके बनवायला लेखाधोरणांना धाब्यावर बसवायची. इंस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्सने घालून दिलेल्या नियमांना धुडकावत आपला नफा दाखवायची. असो. या शिवाय नवरत्न समजल्या गेलेल्या कंपन्या पण आता विकल्या जाणार आहेत. विचार करा एखाद्या व्यावसायिकाच्या पत्निला तुम्ही सांगत आहात की कामगारांचे पगार देण्यासाठी तुम्हाला नवरत्नाचा हार विकायला लागेल, ती स्त्री काय प्रतिक्रिया देइल हे इथे वेगळं सांगायला नको. पण आपल्या देशात नवरत्नांचाही बाजार मांडला जातो.

मूल्यांकन प्रक्रिया

कंपन्या कोणत्याही विका. कंपन्या विकायच्या शास्त्रशुध्द पध्दतिंना डोक्यावर घेउन नाचायचं थोडंच आहे. पण वापरलेली गोष्ट विकत घेताना कोणीही मनुष्य ती नवीन वस्तूच्या किमतीपेक्षा जास्त किंमत देउन घेणार नाही हा साधा व्यवहार आहे. शेवटी निर्गुंतवणूकीकरण असं नाव जरी दिलं तरी ती जुन्या मालमत्ता विकायचीच प्रक्रिया. आपण पूर्ण खाजगीकरण देखील नाही करणार त्यामुळे मग भारतीय दंडविधानाचं बारावं कलम,कंट्रोलर आणि ऑडिटर जनरलचं बारिक लक्ष आणि परिक्षणाची टांगती तलवार सतत खरेदीदाराच्या डोक्यावर राहाणार हे खरं. पण मूल्यांकन करणा-या सगळ्या संस्था (देशी असोत किंवा विदेशी) ही गोष्ट लक्षात घेउनच तर किमान मूल्यांकन काढतात. पण महद् दुःखाची गोष्ट अशी की आम्हाला किमान मूल्यपण मिळत नाही आहे. २००१ सालात झालेलं भारत ॲल्युमिनीयमचं उदाहरण घेउ यात. सरकारी सूत्रांने दिलेल्या माहितीनुसार मूल्यांकनाच्या चार प्रक्रिया वापरल्या गेल्या भविष्यातली रुपयाची किंमत लक्षात घेऊन हातात येणा-या रोख रकमेचं आजचं मूल्यांकन, तुलनात्मक मूल्यांकन पध्दति, ताळेबंदाप्रमाणे होणारं मूल्यांकन आणि मालमत्तेच्या बाजारभवाचं मूल्यांकन. यातली सगळ्यात जास्त किंमत त्यांनी काढली असणार हे वेगळं सांगायला नको. २२/०२/०१ ला ही प्रक्रिया संपली आणि अर्थवृत्त देणा-या भारतातल्या बिझीनेस स्टॅंडर्ड या वृत्तपत्राने २३/०२/०१ ला या प्रक्रियेत वापरल्या गेलेल्या मूल्यांकनांची यादी दिली होती. या पध्दतिप्रमाणे सर्वोच्च मूल्यांकन होतं ते ९९४ कोटीचं आणि कमीतकमी मूल्यांकन होतं ते ५८७ कोटीचं.

तरी सरकारने आपलं ५१ टक्के भागभांडवल स्टरलाइट या कंपनीला ५५१ कोटीला म्हणजे सर्वात कमी मूल्यांकनापेक्षाही खाली का विकाव ?

हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. अनेक तज्ञ यची वेगवेगळी कारणं सांगतात. कोणी म्हणतं या कंपनीला घेण्यासाठी योग्य दावेदारच नव्हते, कोणी लेखाधोरणांकडे बोट दाखवतात- स्थावर मालमत्तेचं मूल्यांकन बाजारभावाप्रमाणे फक्त ती कंपनी बंद होतानाच करता येतं वगैरे वगैरे. पण शेवटी मूल्यांकन बरोबर होत नाही हे सत्य वादातीत आहे.

मूल्यांकन कोण करतं ?

मूल्यांकनाची प्रक्रिया जेव्हा सुरु झाली तेव्हा सार्वजनिक व्यवसाय विभागाने मोठ्या टिमक्या मारल्या होत्या की आम्ही निर्निवेशनाच्या प्रक्रियेत सर्वोत्तम किंमतच मिळवून देउ पण या वल्गना हवेतच विरल्या. पहिल्या पहिल्यांदा त्यांना सार्वजनिक कंपन्यांच्या अध्यक्षांनाच प्रश्न विचारावा लागला तुम्हाला काय वाटतं तुमच्या कंपनीचं काय मूल्य असावं? पण त्यानंतर मात्र या कंपन्यांच्या अध्यक्षांना या निर्गुंतवणूकीच्या प्रक्रियेत स्थानच नाही . आता मूल्यांकनाची कामं एबीएन ॲम्रो, मॉर्गन स्टॅनले, डीएसपी मेरिल लिंच अशी बडी नावं असलेल्या कंपन्या करतात. त्यांचा आंतर्राष्ट्रीय अनुभव या प्रकरणात कामी येतो म्हणे. त्या आधी एसबीआय कॅप्स, आयडीबीआय, आयसीआयसीआय सारख्या देशी कंपन्या ही कामं करीत. पण सर्वात मजेदार गोष्ट म्हणजे देशी कंपन्यांच्या आधी एस.टी.राजा कन्सल्टंट्स हे काम करायचे. हे नावसुध्दा किती जणांनी ऐकलं होतं कोणास ठाउक ? राजे साहेबांचा कारभार पण राजेशाहीच त्यामुळेच असेल पण त्यांच्या काळात झालेल्या मूल्यांकनामुळे सरकारला सर्वोत्तम किंमत अशी कधीच मिळाली नाही.

निर्गुंवणूकीनंतरचे दिवस

नवीन कल्पना कोणतीही असू देत. ती जनमानसात रुजवायची म्हणजे बराच अभ्यास करावा लागतो. राजकारणी मंडळीना हे मान्य असो वा नसो पण निर्गुंतवणूकी बाबतचा गृहपाठ कमी पडला आहे. निर्गुंतवणूकीचे परिणामही आता दिसायला लागले आहेत.एखाद्या कंपनीचे निर्गूंतवणूक होणार म्हंटलं की भांडवल बाजार जोरात उसळतो, जागोजागीचे तज्ञ किंमतींबद्दल अंदाज वर्तवतात, संकेतस्थळं,आर्थिक वर्तमानपत्रं आराखडे बांधायला लागतात, खरेदीदार कोण असणार यावर सट्टा होतो, त्या कंपनीच्या समभागांच्या खरेदीला नुसतं उधाण येतं. ज्यांना खुल्या विक्रीत नंबर लागतो त्यांची चांदी होते पण या खुल्या खरेदीची तारिख संपली की मग या समभागांच्या किमती झपाट्याने कोसळतात. काहींचे तर आर्थिक निकालही वाइट यायला लागतात. त्यामुळेच असेल १६ सप्टेंबरला सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निणयामुळे एचपीसीएल आणि बीपीसीएल या कंपन्यांच्या समभागांच्या किमती झापाट्याने घरंगळल्या. बाजराच्या अपेक्षेप्रमाणे निर्णय नव्हता ना हा ! मारुतीच्या निर्गुतवणूकीलाही आवाहन दिलं जाण्याची शक्यता निर्माण झाली.

| कंपनीचे नाव | विकत घेतल्याची प्रति समभाग किंमत | विकत घेणारी कंपनी |
|---|---|---|
| आयपीसीएल | रु.२३१ | रिलायन्स |
| व्हीएसएनएल | रु.२०२ | टाटा |
| आयबीपी | रु.१५५१ | आयओसी |
| सीएमसी | रु. १९७ | टीसीएस |
| मारुती | रु.१२५ | सामान्य नागरिक |
| मॉडर्न फुड्स | रु.११४९० | हिंदुस्थान लिव्हर |
| हिंदुस्थान झिंक | रु.४०.५० | स्टर्लाइट |

आंतर्राष्ट्रीय स्तरावर चित्रं

जर आपल्याकडे निर्गुंतवणूकीची प्रक्रिया पहिल्यांदाच चालू झाली आहे तर आपण आंतर्राष्ट्रीय अनुभवातून काही शिकायला नको का ? हवं. कॅनडा आणि स्पेन हे देश तोट्यातल्याच कंपन्यांच खाजगीकरण करतात तर ब्रिटन आणि चिली फायद्यातल्याच, रुमानिया,मेक्सिको,रशिया हे फक्त छोट्याच कंपन्यांचं खाजगीकरण करतात, तर भारतात मनाला येइल त्या कंपन्यांचं. आपले एके काळी राज्यकर्ते असलेल्या इंग्रजांनी नॅशनल फ्रेट कॉर्पोरेशन, मेक्सिकोतल्या टेलिमेक्स या कंपन्यांनी निर्गुंतवणूकीच्या प्रक्रियेत कामगारांनासुध्दा स्थान दिलं. पण भारतात अजून

कामगारांना या प्रक्रियेत काहीच स्थान नाही. वातानुकुलित कार्यालयात बसून निर्णय घेणं सोपं आहे पण खरं काम करतात ते हे कामगार मित्र. त्यांच्या हितासाठी अजून पुरेशा सुधारणा होत नाही आहेत. म्हणूनच मग एचपी सारख्या कंपनीत कामगार तीन दिवस संपावर जातात, जेसपसारख्या संस्थेतील कामगार संघटना न्यायालयात दाद मागतात. युरोपात अजून एक महत्वपूर्ण देश आहे फ्रांस. त्यांनी मूल्यांकनासाठी दोन वेगळ्या बँकाच नियुक्त केल्या आहेत. खाजगी करण समितीसमोर त्या मूल्यांकनं ठेवतात आणि मग खाजगीकरण समिती सरकारपुढे ठेवते. पण खाजगीकरण समितीच्या किमतीच्या खाली सरकार कधीच किंमत मागत नाही. आपल्या देशात मात्र सगळ्या त-हाच निराळ्या.

खरेदीदार कोण असावेत ?

दिनांक २८ मार्च २००३ ची बातमी. कलकत्ता उच्च न्यायलयाने जेसपच्या निर्गुंतवणूकीला अवैध ठरवलं. २७.०२.०२ ला या कंपनीची विक्री १८.१८ कोटी रुपयांना झाली होती. आणि खरेदी करणारी कंपनी होती रुइया कोटेक्स. पण तिकडे आखातात चाललेल्या युध्दामुळे ही बातमी कुठेतरी दबून गेली होती. अन्यथा निर्गुंतवणूक प्रक्रियेतला हा महत्वाचा निर्णय होता.

रुइया कोटेक्स ही स्वतःच एक दिवाळखोर कंपनी. यांनीच अजून बँकांचे पैसे फेडलेले नाहीत. हे काय जेसपला बाहेर काढणार आर्थिक अडचणीतून. म्हणूनच मग जेसपच्या कामगार संघटनांनी कोर्टाकडे दाद मागितली. जेसपचा साठलेला तोटा ३५१ कोटी रुपयांचा आहे. ही कंपनी रेल्वेला वाघिण्या पुरवण्याचं काम करते. पण या कंपनीची मोक्याच्या ठिकाणी ७० एकरची जमिन आहे आणि यावरच डोळा ठेउन ही कंपनी विकत घेण्यात आली. मूल्यांकन कसं केलं गेलं हा पुन्हा स्वतंत्र समिती नेमायचा विषय. पण अशा कर्जबुडव्या कंपन्यांना निर्गुंतवणूकीच्या प्रक्रियेत स्थानच का दिलं जातं ? आणि स्थान दिलं ते दिलं वर रेल्वेला विकण्यात आलेल्या जमिनीचे आठ कोटी रुपये आणि स्हा कोटी रुपयांचा कच्चा माल यांना दिला जाणार. म्हणजे पाच कोटी रुपये ही जेसपची किंमत. यामुळे निर्गुंतवणूक खरंच वित्तिय तूट तरी भरुन काढणार का अजून वाढवणार हा प्रश्न नक्कीच पडतो.

येत्या काही दिवसात शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या सार्वजनिकनिर्गुंतवणूक प्रक्रियेत एस्सार शिपिंग भाग घेत आहे या कंपनीचं बरच देणं आहे आयडीबीआय कडे.

ओएनजीसीचा काय गुन्हा ?

हिंदुस्थान पेट्रोलियमच्या निर्गुंतवणूक प्रक्रियेत भाग घ्यायला ओएनजीसीला मनाइ करण्यात आलेली होती. याचं कारण देताना असं सांगण्यात आलं की यामुळे एकाधिकार निर्माण होइल. बाजारात एकाधिकार निर्माण होणे हे ग्राहकांच्या हिताचे नाही. पण मग हे हित रिलायन्सला आयपीसीएलसाठी निवीदा भरताना कुठे गेलेलं ? दुसरं कारण म्हणजे एका सरकारी कंपनीने दुसरी कंपनी घेणे हे निर्गुंतवणूकीचे लक्षण नाही. मग जेव्हा आयओसीने आयबीपीला विकत घेतलं तेव्हा कुठे होतं हे लक्षण ? थोडक्यात काय निर्गुंतवणूकीच्या प्रक्रियेत कुठेच एकसूत्रता नाही. जो निकष एखाद्याला लागू होइल तो दुस-याला लागू होइलच याची शाश्वती नाही.

अर्थपत्रकांचे सादरीकरण

सरकारने निर्गुंतवणूकीच्या करारात एक कलम टाकलं आहे. सरकारी कंपन्यांनी बनवलेल्या अर्थपत्रकांत आणि खाजगी संस्थेने विकत घेतल्यावर त्यांनी बनवलेल्या अर्थपत्रकांत जर काही फरक लागला तर सरकार त्याची भरपाइ करणार. या कलमाचा साधासरळ अर्थ म्हणजे कंपनी पण घे आणि कंपनी घेतल्याबद्दल आमच्याकडून बक्षिसपण घे. झुआरी- मर्डोक कंपनीने पॅरादिप फॉस्फेट नामक कंपनी विकत घेतली ती रु. १५१.७ कोटीला. ६७० कोटी रुपयांची जनतेची गुंतवणूक विकायला काढली तीअत्यंत पडेल भावात. वर्ष पूर्ण व्हायच्या आधीच ही विक्री झाली त्यामुळे मग अर्थपत्रके प्राइसवॉटर हाउस-कूपर्स या झुआरींच्या लेखापरिक्षकांनी बनवली आणि त्यांनी कंपनीच्या मालमत्तेची किंमत लावली ती उणे २०५ कोटी. या लेखापरिक्षणाच्या आधारावर १५१.५५ कोटीचा दावा बिर्ला या झुआरींच्या प्रवर्तकांनी सरकारकडे लावला. म्हणजे कंपनीची किंमत झाली मात्र १५ लाख रुपये.

अर्थपत्रके पण शिजतात...

ऑक्टोबर २००१ मध्ये हिंदुस्तान टेलि. या कंपनीला हिमाचल फ्युचुरिस्टीक या कंपनीने विकत घेतले - रु. ५५ कोटीला. तेव्हा हिंदुस्थान टेलि ने दावा केलेला की त्यांना निव्वळ नफा आहे २.०१ कोटीचा. पण प्रत्यक्षात मात्र या कंपनीला तोटा होता. त्यामुळे आता हिमाचलने कंपनीने सरकार कडे दावा लावला आहे. पण एक गोष्ट इथे नमूद करायला हवी ती म्हणजे हिमाचल फ्युचुरिस्टीकला निर्गुंतवणूक प्रक्रियेत सहभागीच कसं होउ दिलं ? या कंपनीवर केतन पारेख प्रकरणात चौकशी चालू आहे. आणि सुखराम बरोबरचे त्यांचे संबंध तर जगजाहिर आहेत. पण तरीही ते या प्रक्रियेत सहभागी झाले. कोणी सहभागी व्हावं यावर निर्बंध नाहीत त्यामुळे ही धक्कादायक बातमी नाहीच तशी पण आत्तापर्यंत सामान्य नागरिकाचा जो समज होता की खाजगी क्षेत्रातल्याच कंपन्या आपली अर्थपत्रके शिजवू शकत असतील- त्याला हिंदुस्थान टेलि. प्रकरणामुळे जोरदार तडा गेला असेल.

भांडवल बाजारात नोंदवल्या न गेलेल्या सरकारी कंपन्या त्यांची अर्थपत्रके मॅनेज करु शकतात आणि खाजगी कंपन्यांच्या हातात ती कंपनी पडल्यावर ते आपल्या पध्दतिने ताळेबंद मांडणार हे काय सरकारला माहिती नव्हतं का काय ? मग तरी अशा प्रकारचं कलम टाकून सरकार खाजगी कंपन्यांना सरकारी मालमत्तेची खिरापत वाटायची कामं का करते हे त्या सर्वश्रेष्ठ परमेश्वरासच ठाउक.

गुंतवणू कदारांशी करार

रुइया कोटेक्स आणि जेसप हे प्रकरण न्यायलयानी बीआयफआर कडे नव्याने मांडणी करण्यासाठी सूपुर्द केलेले होते. उच्च न्यायलयाच्या या निर्णयामुळे पुन्हा एकदा निर्गुंतवणूक प्रक्रियेतल्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. पुन्हा एकदा म्हणायला कारण असं की या आधी मुंबइतल्या सेंटॉर हॉटेलच्या बाबतीत ही निर्गुवणूकीच्या मर्यादा स्पष्ट झाल्या होत्या. निर्गुंतवणूकीची प्रकिया पारदर्शी व्हायला पाहिजे. सेंटॉर हॉटेलच्या बाबतीत तर सगळाच सावळा गोंधळ होता. बात्रा हॉस्पिटॅलिटी नावाच्या कंपनीने हे हॉटेल ८३ कोटीला विकत घेतलं आणि काही दिवसातच सहारा ग्रुपला - (अॅम्बी व्हॅलीत तेंडूलकर आदि प्रभूतिंना २ कोटी रुपये किमतीचे फ्लॅट्स देणारा तो हाच समूह बरं का ! ) ११५ कोटीला विकलं. व्यवस्थितपणे ३५ टक्के बसल्याबसल्या दलाली. सहारा समूहाला काय थेटपणे सरकार कडून हे हॉटेल घेता नसतं आलं. उगाच कशाला ३२ कोटी रुपये भरायचे जास्तीचे ? हे हॉटेल मुंबइ विमानतळाच्या नजीक आहे. विमान व्यवसायाला पुरक असल्यामुळे हे हॉटेल घ्यायला काय सरकार बंदी घालणार होतं ? अहो पण ही पुनर्विक्री झाली त्यामुळे हॉटेल विकत घेताना सरकारने या बात्रांबरोबर केलेले करार मदार संपुष्टात आले. आणि हेच तर सहाराला पाहिजे होतं सरकारचे कोणतेही निर्बंध नसलेलं हॉटेल. त्यासाठी ३२ कोटी रुपये फार मोठी किंमत थोडी आहे. कुठेतरी करारपत्रकात अटी,शर्ती मांडायला, कलमं लिहायला चुकतं आहे.

बॅकांचे सहाय्य...!

या निर्गुंतवणूकीच्या प्रक्रियेत खरेदीदाराला सहाय करायला रिझर्व बॅंकेने परवानगी दिली आहे. या बॅंका १५ ते २० हजार कोटी रुपयांची कर्ज देण्याची आस लाउन बसल्या आहेत. सहाय देणा-या या बॅंका बहुतेक करुन राष्ट्रीयीकृत आहेत. म्हणजे हा पैसा सरकारकडूनच येणार आणि सरकारलाच जाणार फक्त खरेदीदाराच्या मार्गे. या अर्थसहायाने मात्र खरेदीदार आक्रमकपणे किमती सांगतात सार्वजनिक कंपनी खरेदी घ्यायला. आणि पुढे हेच कर्ज फेडायला पाहिजे म्हणून मग ते सार्वजनिक कंपनीच्या स्थावर मालमता विकायला काढतात. त्यामुळे सार्वजनिक कंपनीची स्थिती मात्र खालावते आणि एक नवीन कर्जखातं बॅंकिंग क्षेत्रात निर्माण झाल्याबरोबर दुसरं खातं त्रस्त होतंय. साधं उदाहरण द्यायचं झालं तर विदेश संचार निगम लिमीटेडचं देता येइल. या दूरसंचार क्षेत्रातल्या भल्या मोठ्या कंपनीला टाटा उद्योगसमूहाने २५०० कोटीला विकत घेतले. त्यानंतर टाटा टेलि नावाच्या तोट्यातल्या कंपनीमध्ये या विदेश संचार निगमला गुंतवणूक करायला लावली. २५ टक्के समभाग १२०० कोटी रुपयांना विकत घ्यायला लावले. म्हणजे टाटांनी विदेश संचार आणि तोट्यातली आणि फक्त आंध्र प्रदेशात कार्यरत असलेली टाटा टेलि या दोघांना एकाच पारड्यात तोललं. यामुळे आता विदेश संचारची स्थिती पूर्वीसारखी राहिलेली नसेल हे कोणी ही सांगेल

या उद्योगसमूहाची ताकद कोणाला माहिती नाही ? त्यांनी केलेली कोणतीही कृति ही कशी बरोबर आहे हे दाखवायला ते दहा तज्ञ मंडळी उभी करु शकतील. तांत्रिक दृष्ट्या त्यात काही चूक नसेलही पण अशाप्रकारे जर देशातला सगळ्यात मोठा उद्योगसमूह सार्वजनिक कंपन्यांच्या मालमत्तेची विल्हेवाट लावणार असेल तर बाकीच्या

कंपन्यांसाठी तो दंडकच होउन जाइल. निर्गुंतवणूक हा घरदार खाउन खिडक्या तोंडी लावायचा प्रकार आहे पण ही आमची गरज आहे. कारण त्यामुळे सार्वजनिक कंपन्यांची कार्यक्षमता वाढणार आहे. अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरु होणार आहे. आणि न जाणे काय काय ? कुठे जात आम्ही पुढे काय आहे ? सरकारला हा प्रश्न पडणार का कधी ? सरकारकडे सध्या पैसे नाहीत कारण ते उद्योगसमूहांना दिल्या जाणा-या सवलतींवर उधळले जातात. करदाता बिचारा घाम गाळून पैसे कमावतो आणि हे बिनधास्तपणे उधळतात मग दिवाळखोरीची राष्ट्रीय आपत्ति निर्माण होते. पण अशा राष्ट्रीय आपत्तिमधून सुध्दा संपत्ति निर्माण होते हे आपल्या कडच्या मोठ्या उद्योजकांनी दाखवून दिलेलं आहे. आपत्तित जो संपत्ती निर्माण करतो ना तोच खरा उद्योजक !

मयूर शरद जोशी
२०९, इंदुलाल कॉम्प्लेक्स,
लालबहादूर शास्त्री रस्ता,
पूणे-४११०३०
mayur_cfe@rediffmail.com